जाक्र/उमाशि-२/इ. ११वीप्रवेश/पुवि/२०११
शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय
दि. ११.७.२०१४

JUL 2014
JUL 2014

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य
उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१४-१५

विषय : इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश शैक्षणिक वर्ष सन २०१४-२०१५
संदर्भ : इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेशासंदर्भातील या कार्यालयाची सर्व परिपत्रके व प्रसिध्दीपत्रके

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये कळविण्यात येते की, इयत्ता ११ वी प्रवेशाची तिसरी गुणवत्ता यादी दिनांक ११.७.२०१४ रोजी सायकांळी ६.०० वाजता जाहीर करण्यात आलेली आहे. तिस-या गुणवत्ता यादीनुसार दिनांक १३.७.२०१४ व १४.७.२०१४ रोजी प्रवेश करतांना कार्यालयाचे दि. ५.७.२०१४ च्या परिपत्रकातील सुचनांचा अवलंब करावा. इयत्ता ११ ऑनलाईन सर्व प्रवेश दिनांक १४.७.२०१४ रोजी पूर्ण झाल्यानंतर प्रवेश समितीचे कामकाज पूर्ण होत आहे. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात रिक्त राहिलेल्या जागेवर खालील वेळापत्रकानुसार व सुचनेनुसार आपल्यास्तरावर प्रवेश करण्यात यावेत.

१. ज्या विदयार्थीना ऑनलाईन प्रवेश अर्ज भरता आलेले नाहीत असे विदयार्थी.

२. प्रवेश प्रक्रिया चालू असतांना बाहेरुन बदली होऊन आलेले व ऑनलाईन प्रवेश अर्ज भरु न शकलेले विदयार्थी

३. ज्या विदयार्थीनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरला पण दिलेला प्रवेश विहीत मुदतीत घेतलेला नाही असे विदयार्थी

४.ए.टी.के टीचे विदयार्थी

## प्रवेशाचे वेळापत्रक

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियाबाबतचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | १५,१६ व १७ जुलै २०१४ | स. ११.०० ते ५.०० | कनिष्ठ महाविद्यालय प्रवेश अर्ज स्वीकारणे |
| २. | दि. १८ व १९ जुलै २०१४ | -- | प्राप्त प्रवेश अर्जानुसार गुणवत्ता यादी करणे |
| ३. | दि. २१ जुलै २०१४ | स.११.०० | गुणवत्ता यादी जाहीर करणे |
| ४. | दि. २२,२३,२४ जुलै २०१४ | स. ११.०० ते ४.०० | गुणवत्ता यादीनुसार रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश देऊन प्रवेशाचे काम पूर्ण करणे. |

**खालील सूचनानुसार प्रवेश अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही करावी.**
**सुचनांचा तपशील**

१. प्रत्येक कॉलेजने दर्शनी भागात तिस-या ऑनलाईन फेरीतील शाखानिहाय व आरक्षणनिहाय कटऑफ व रिक्त जागा संदर्भातील माहिती विदयार्थ्यांना दिसेल अशी लावावी.
२. प्रवेश अर्ज देते वेळी विदयार्थ्यांचा मुळ शाळा सोडल्याचा दाखला व गुणपत्रक तपासून प्रवेश अर्ज भरुन घ्यावा.
३. घेतलेल्या प्रवेश अर्जाची विदयार्थ्याला पोहोच दयावी.

४. आलेल्या प्रवेश अर्जाबाबत खालील नमुन्यात रजिस्टर ठेवण्यात यावे.

| अ.क्र. | विदयार्थ्यांचे नाव | बोर्डाचे नाव | प्रवेशासाठी निवडलेली शाखा व माध्यम | विदयार्थ्यांचे सामाजिक व समांतर आरक्षण | प्रवेश अर्ज स्वीकारणा-या कर्मचा-याची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

५. दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश अर्ज घेण्यात यावा व त्याची गुणवत्ता यादी तयार करुन प्रवेश देण्यात यावेत.

६. गुणवत्ता यादी तयार करतांना सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय रिक्त राहिलेल्या जागा लक्षात घेऊन व प्राप्त झालेले अर्ज त्यातील सामाजिक व समांतर आरक्षण लक्षात घेऊन त्याप्रमाणे गुणवत्ता यादी तयार करावी.

७. गुणवत्ता यादी तयार करतांना कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता गांभीर्याने घ्यावी.

८. एस.एस.सी. बोर्डाच्या Verification नंतर जे विदयार्थी उत्तीर्ण झाले किंवा उत्तीर्ण विदयार्थ्यांचे गुण वाढलेले असतील त्या बाबतची आवश्यक ती कागदपत्रे तपासून गुणवत्ता यादीमध्ये त्यांचा विचार करावा.

९. कॉलेजस्तरावरील गुणवत्ता यादी तयार करतांना ती दर्शनी भागात लावावी व त्या यादीचे कट ऑफ शाखानिहाय व आरक्षणनिहाय लावावेत.

१०. जे विदयार्थी गुणवत्ता यादीत बसतील त्या विदयार्थ्यांना वेळापत्रकातील कालावधीप्रमाणे प्रवेश देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

११. जे अपंग विदयार्थी वंचित राहत असतील त्यांचा प्रथम प्राधान्याने विचार करण्यात यावा.

१२. गर्दी झाल्यास व आवश्यकता भासल्यास त्वरित पोलीस बंदोबस्त मागवून घ्यावा.

१३ कॉलेज स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर झालेल्या प्रवेशाची माहिती सादर करण्यासाठी स्वतंत्र परिपत्रक देण्यात येईल त्याप्रमाणे झालेल्या प्रवेशाची माहिती सादर करावी.

१४. कोणत्याही परिस्थितीत क्षमतेपेक्षा (व्यवस्थापन कोटा,अल्पसंख्यांक कोटा,इन हाऊस कोटयासह) प्रवेश करण्यात येऊ नयेत अन्यथा या बाबत प्राचार्य जबाबदार राहतील.

१५. झालेल्या प्रवेशाची माहिती दर्शनी भागात तसेच आपल्या वेबसाईट ( संकेतस्थळ) वर टाकण्यात यावी.

१६. (R.T.I) माहिती अधिकारात मागितलेली माहिती संबंधितांना वेळेत देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त सर्व सुचनांचा विदयार्थ्यांच्या प्रवेशासाठी गांभीर्याने अवलंब करण्यात यावा.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.